# 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम



# संकेतस्थळ व माहिती व्यवस्थापन -

- संकेतस्थळ 2004 पासून कार्यरत असून वेळोवेळी सुधारणा करण्यात येतात. तसेच सर्व सेवा फेब्रुवारी 2016 पासून ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात आलेल्या आहेत.
- संकेतस्थळ मराठी व इंग्रजी भाषांमध्ये उपलब्ध, दृष्टिहीन व शारीरिकदृष्ट्या अक्षम व्यक्तींकरीता सहज व सुलभ.
- उद्योगांना संमतीपत्राच्या वैधतेपूर्वी 90 दिवस अगोदर मोबाईल व ईमेलद्वारे सूचना.
- उद्योगांना मार्गदर्शन करण्याकरीता संमतीपत्र अर्जा बाबत मार्गदर्शक माहिती. तसेच संमतीपत्र अर्जाची सद्यस्थिती पहाण्याची सुविधा.
- अदा केलेली संमतीपत्रे ब्लॉकचेन पद्धतीचा वापर करुन सुरक्षितीकरण.
- विविध कामांच्या निविदा, उद्योगांच्या जनसुनावणी व घेण्यात आलेले विविध कार्यक्रम या बाबतची माहिती नियमीतपणे अद्यावतीकरण.

# माहिती अधिकार व सायबर सुरक्षा -

- माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम 4 अंतर्गत सर्व माहिती संकेतस्थळावर नियमित अद्ययावत केली जाते.
- MeITY च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सायबर सुरक्षेची अंमलबजावणी.
- CERT-In मान्यताप्राप्त संस्थांमार्फत सुरक्षा ऑडिट.
- Azure Cloud बॅकअप प्रणाली.
- विश्वसनीय प्रमाणपत्र प्राधिकरणांकडून SSL/TLS प्रमाणपत्र प्राप्त करून सुरक्षित व एनक्रिप्टेड संवाद सुनिश्चित.
- नविन Endpoint Detection System वापर - पारंपरिक Anti-virus पेक्षा अधिक कार्यक्षम. नवीन प्रकारचे Malware अंमलात येण्यापूर्वीच थांबविणे.
- संमतीपत्रांच्या 4 सेवा प्रकार अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिध्द, 3 सेवा प्रकार अधिसूचित करणे प्रस्तावित.

# केंद्र शासनाशी सुसंवाद -

- प्रलंबित प्रस्ताव - **राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP)**– 9 शहरे राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतंर्गत व 10 शहरे 15 व्या वित्त आयोगाअंतर्गत समाविष्ट. या शहरातील हवा गुणवत्ता सुधारण्याकरीता 15 व्या वित्त आयोगाअंतर्गत रु. 2981 कोटी निधी राखीव - त्यापैकी अद्याप पर्यंत रु. 1555.35 कोटी निधी प्राप्त व NCAP अंतर्गत रु. 199.06 कोटी निधी प्राप्त व रु. 37.88 कोटी निधीअप्राप्त - उर्वरीत निधी करीता पाठपुरवठा सुरु.
- निधी प्राप्ती करीता भागधारकांबरोबर राज्य स्तरीय हवा गुणवत्ता सनियंत्रण समिती (AQMC)/ राज्यस्तरीय सनियंत्रण आणि अंमलबजावणी समिती (SLMIC) च्या 16 आढावा बैठका व मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीच्या 11 बैठका घेऊन, अढावा केंद्र शासनास सादर करून निधी प्राप्ती बाबत पाठपुरवठा.
- 15 व्या वित्त आयोगाच्या अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीपैकी सन 2023-24 व 2024-25 यावर्षांचा निधी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्याने केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात आलेला नाही.

# केंद्र शासनाशी सुसंवाद -

- 9 अति प्रदूषित क्षेत्रांमध्ये कृती आराखडयांची अंमलबजावणी - 7 मध्ये सुधारणा होऊन तीव्र प्रदूषित व इतर प्रदूषित संवर्गामध्ये वर्गीकरण; उर्वरित 2 साठी कार्यवाही सुरु.
- 115 ठिकाणी हवा गुणवत्ता त्रयस्थ संस्थामार्फत तपासणी. विविध नदयांचे 156 ठिकाणी, समुद्र, खाडी व नाल्यांची 44 ठिकाणी तपासणी - अहवाल जलशक्ती मंत्रालय व मंडळाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध.
- 36 ठिकाणी सतत ध्वनी गुणवत्ता तपासणी सयंत्रणा Real Time Noise Monitoring System बसवण्यात आलेले असून याकरीता लागणाऱ्या एकूण निधी रु. 15.88 कोटी पैकी रु. 6.12 कोटी निधी केंद्र शासनाद्वारे प्राप्त.
- केंद्र शासनाद्वारे जानेवारी 2025 नंतर 236 विविध पत्रे प्राप्त त्यापैकी 215 वर उचित कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर व उर्वरीत 21 वर कार्यवाही सुरु.

# अभिलेख व्यवस्थापन व स्वच्छता -

- मुख्यालय व प्रादेशिक कार्यालयांतील 2.5 कोटी कागदी दस्तावेज स्कॅन करून डेटा सेंटरमध्ये जतन.
- निर्लेखनादरम्यान 23,559 कि.ग्रा. पेपर/पुठ्ठा विल्हेवाट.
- 1039 निरुपयोगी संगणक व उपकरणे प्राधिकृत पुर्नचक्रिय केंद्रांमार्फत विल्हेवाट.
- 21 निर्लेखित वाहनांची योग्य पद्धतीने विल्हेवाट.
- जड वस्तू नोंदवह्या 31 मार्च 2025 पर्यंत अद्ययावत.
- कार्यालयामध्ये पुरुष व महिलांकरीता स्वच्छ प्रसाधनगृह.
- कार्यालयामध्ये एकल वापर प्लास्टिक बॉटलचा वापर केला जात नाही.
- अभ्यांगतांकरीता स्वतंत्र कक्ष तसेच वेस्ट प्लास्टिक पासुन बनविलेली आसन व्यवस्था.

# तक्रार निवारण प्रणाली -

- आपले सरकार व पी.जी. पोर्टलमार्फत प्राप्त 2258 तक्रारींपैकी 2100 सोडविल्या 158 तक्रारी प्रलंबित.
- अभ्यागतांसाठी नियोजित भेटी – दुपारच्या सत्रात दु. 02.00 ते संध्या. 05.00 या वेळेमध्ये भेटी करीता परवानगी. विशेष परिस्थितीमध्ये नियोजित वेळेनुसार भेट देण्यात येते. दि. 18/01/2023 रोजी परिपत्रक जारी.
- सदस्य सचिव यांना भेटण्याकरीता प्रत्येक सोमवारी कार्यालयीन वेळेमध्ये पूर्व परवानगी शिवाय भेटण्याची मुभा.
- लोकशाही दिन कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त तक्रारींचे संबंधित क्षेत्रिय कार्यालयांमार्फत निराकरण केले जाते.

# ई-ऑफिस व प्रशासनिक सुधारणा -

- 4 स्तरांमध्ये संमतीपत्र अर्ज प्रक्रिया – पारदर्शकता व कार्यक्षम निर्णय तसेच स्वयं नुतनीकरण प्रणालीमुळे अर्ज नुतनीकरण वेगाने पूर्ण. संमतीपत्र अदा करण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने.
- हवा व जल गुणवत्ता देखरेख प्रणाली मध्ये सर्व संनियंत्रित केंद्रांचे मापदंड तसेच गुणवत्ता निर्देशांकाचे गणन इत्यादी अद्यावत माहिती नागरिकांच्या सुविधे करता संकेतस्थळावर उपलब्ध.
- संगणकिय प्रणाली आधारीत उद्योगांची मासिक पाहणी वेळापत्रक उद्योगास आगावू अवगत करुन पाहणी.
- संमतीपत्रा करीता लागणारे शुल्क तसेच उद्योगांचे हवा व सांडपाणी नमून्यांचे शुल्क हे ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारणे.
- औदयोगिक सांडपाण्याचे व धुरांडयातून निर्गमित होणाऱ्या हवेचे नमूने घेऊन त्याचा अहवाल ऑनलाईन पदध्तीने उदयोगास तात्काळ पाठविला जातो.

# ई-ऑफिस व प्रशासनिक सुधारणा -

- नागरिकांना भ्रमणध्वनी ॲप, ई-मेल, विविध सामाजिक माध्यम द्वारे प्रदूषणाविषयी तक्रार करता येतात.
- सहाय्यताकक्ष सुविधा मुख्यालयात कार्यरत.
- वृत्तपत्र/ इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध / प्रसारीत होणाऱ्या बातम्यांबाबत योग्य ती खातरजमा करुन त्याबाबतचा खुलासा.
- भारत सरकारच्या दि. 29/01/2025 ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय. या अधिसूचनेनुसार हिरवा, नारंगी व लाल संवर्गात मोडणाऱ्या उद्योगांकरीता संमतीपत्र प्रदान करण्याची किंवा नाकारण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.
- उद्योगांच्या सुनावणी, बैठका तसेच क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या बैठका ऑनलाईन पद्धतीने.
- आरोग्यसेवा आस्थापनांना अदा करण्यात येणारे संमतीपत्र व प्राधिकारपत्र पूर्वी भांडवली गुंतवणुकीच्या आधारे शुल्क आकारुन अदा करण्यात येत होते. इंडियन मेडिकल असोसिएशनमार्फत प्राप्त मागण्यांनंतर, संमतीपत्र शुल्क प्रणालीत सुधारणा करून खाटांच्या संख्येच्या आधारे शुल्क आकारणी.

# ई-ऑफिस व प्रशासनिक सुधारणा -

- पर्यावरण दक्षता केंद्राची स्थापना करुन त्याद्वारे खालील प्रकारच्या प्रदूषण पातळीचे मुल्यांकन व जनतेच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसारण.

✓ 69 ठिकाणी सतत वातावरणीय हवा तपासणी देखरेख व संकेतस्थळावर प्रसारण.

✓ 06 रासायनिक उद्योग क्षेत्रामध्ये सतत VOC (Volatile Organic Compounds) तपासणीवर देखरेख व अहवाल संकेतस्थळावर प्रसारण.

✓ 36 ठिकाणी सतत ध्वनी प्रदूषणावर देखरेख.

✓ अतिप्रदूषित उद्योगांनी बसविलेल्या सतत उत्सर्जन निरीक्षण प्रणालीद्वारे सांडपाणी व धुरांड्यातून निर्गमित होणाऱ्या प्रदूषण मानंकांची देखरेख.

- दैनंदिन कामकाजाची देखरेख करण्याकरीता एकत्रित विहंगम दृष्टीकोन असलेला सारांश फलक (dashboard) बनविलेला असून त्याद्वारे संमंतीपत्र अर्ज, तक्रारी व कायदेशीर कारवाई इत्यादींचा सारांश एकत्रितपणे ऑनलाईन पाहता येतो.

## ई-ऑफिस व प्रशासनिक सुधारणा -

- मंडळाने घरगुती सांडपाणी केंद्र प्रकल्पांकरीता, घनकचरा व्यवस्थापन व बांधकाम / पाडकाम कचरा व्यवस्थापनाकरीता आदर्श निविदा दस्तावेज तयार करून संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे.
- नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या बांधकाम प्रकल्पांच्या संमंतीपत्र नुतनीकरणाची प्रक्रिया प्रादेशिक स्तरावर कार्यान्वित.
- सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांसह त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी निविदा प्रसिद्ध.
- राज्यामध्ये प्रायोगिक तत्वावर दहा ठिकाणी नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेची सतत तपासणी करण्याकरीता अत्याधुनिक यंत्रणा उभारणी निविदा प्रसिद्ध.
- जानेवारी 2026 पूर्वी मंडळाच्या सर्व कार्यालयांमध्ये 100% पेपर विरहीत कामकाज करण्याचे प्रस्तावित.

# कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान वापर -

- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरीता दि. 24 एप्रिल 2025 रोजी कार्यशाळा घेण्यात आलेली आहे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान खालील बाबींकरीता वापरणे प्रस्तावित.
  - ✓ AI सह अर्ज ट्रॅकिंग प्रणाली.
  - ✓ चॅटबॉटवर आधारित हेल्पडेस्क.
  - ✓ हवा व जल गुणवत्ता डेटाचे विश्लेषण – असामान्य मूल्ये ओळखणे.
  - ✓ OCEMS प्रणालीत दोषी सेन्सर ओळखणे.

# न्यायालयीन व अधिकारी कर्मचारी सेवा विषयक प्रकरणे -

- सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल 239 पैकी 129 प्रकरणे निकाली.
- उच्च न्यायालयामध्ये दाखल 1508 पैकी 1083 निकाली.
- NGT आणि इतर अधिनियम अंतर्गत 1600+ प्रकरणांचा निपटारा.
- मंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जुलै 2024 ते डिसेंबर 2024 या कालावधीमध्ये 3 दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा यशदा, पूणे येथे आयोजित केलेली होती.
- गट-ब व गट – क, संवर्गामधील सेवा भरती वर्षे 2024-25 (1 सप्टेंबर 2024 ते 31 ऑगस्ट 2025) मधील पदोन्नती कोटयातील सर्व रिक्त पदांची प्रक्रिया पूर्ण.
- जानेवारी 2024 ते आजतागायत अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द विविध तक्रारदारांमार्फत प्राप्त 18 तक्रारी पैकी 15 तक्रारींचे निवारण व 3 तक्रारी चौकशीकरीता प्रलंबित.

# गुंतवणूक प्रोत्साहन उपाय

- दि. 27/02/2024 पासून दि. 31/12/2024 पर्यंत संमतीपत्राच्या दंडात्मक शुल्कामध्ये सुट (माफी योजना) योजने अंतर्गत 8565 उद्योगांनी लाभ घेतला असून, त्यांचे संमतीपत्रे मंडळामार्फत नियमित करण्यात आलेली आहेत.
- सहाय्यता कक्ष व दूरदृष्य प्रणाली द्वारे अडचणी सोडवणे.
- OTP बेस डिजिटल सिग्नेचरयुक्त संमतीपत्रे वितरण व त्वरीत उद्योजकास नोंदणीकृत भ्रमणध्वनी व ई-मेल द्वारे उपलब्ध तसेच संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द.
- Green/Orange उद्योगांसाठी विना स्थळ पाहणी संमतीपत्र अदा करणे बाबत धोरण प्रस्तावित.
- प्रादेशिक अधिकारी व उप प्रादेशिक अधिकारी यांच्या स्तरावर औद्योगिक संघटना यांच्या समवेत बैठका.
- दि. 13/02/2025 रोजी नाशिक व दि. 21/02/2025 रोजी छत्रपती संभाजी नगर येथे औद्योगिक संघटना यांच्या समवेत बैठका घेऊन शंकांचे निराकरण.

# नाविन्यपूर्ण उपक्रम -

**जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रणाली** - जैववैद्यकीय कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांचे सूचीकरण आणि बुद्धिमान विश्लेषणात्मक प्रणालीची अंमलबजावणी

- सर्व जैववैद्यकीय कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांचे सूचीकरण.
- क्षेत्रिय सर्वेक्षणाद्वारे भौगोलिक माहिती प्रणाली आधारित सूचीकरण, आवश्यक पॅरामीटर्स बेड क्षमता, कचरा निर्मिती दर, जैववैद्यकीय कचरा संकल सुविधा, विभाजन, साठवण, वाहतूक, प्रक्रिया आणि भौगोलिक वितरणानुसार विल्हेवाटीबद्दल माहिती संकलित करणे.
- भौगोलिक माहिती प्रणाली इंटरफेसद्वारे वेब-आधारित विश्लेषणात्मक प्रणाली. वेब-आधारित विश्लेषणात्मक प्रणाली - जैववैद्यकीय कचरा निर्माण करणाऱ्या आरोग्य सेवा आस्थापना चे प्रोफाइल व निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याची निर्मिती पासून ते शात्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावेपर्यंत रिअल टाईम देखरेख.

# नाविन्यपूर्ण उपक्रम -

## औद्योगिक घातक कचरा ट्रॅकिंग प्रणाली

- घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सिमापार वाहतूक) नियम २०१६ अन्वये उद्योगांना निर्माण होणारा घातक कचरा अधिकृत रिसायकलर्स किंवा सामाईक घातक व इतर कचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्रांना (CHWTSDF) देणे बंधनकारक.
- अधिकृत जागतिक स्थान प्रणाली (वाहन देखरेख प्रणाली) असलेल्या वाहनांद्वारे वाहतूक बंधनकारक.
- उद्योग, सर्व अधिकृत रिसायकलर्स व सामाईक घातक कचरा प्रक्रिया विल्हेवाट केंद्रे यांची स्थान निश्चिती. वाहतूक नियोजित मार्गाद्वारे निश्चित स्थळी पोहचल्याबाबतची देखरेख मंडळाच्या नियंत्रण कक्षामार्फत.

# प्रयोगशाळा –

- राज्यामध्ये 8 NABL मान्यताप्राप्त (ISO/IEC 17025) व सुरक्षा मानके (ISO 45000) प्रमाणित प्रयोगशाळा. त्यापैकी 6 प्रयोगशाळा पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय द्वारे मान्यताप्राप्त आहेत.
- उद्योगांची वाढ लक्षात घेऊन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोल्हापूर, नांदेड, सोलापूर आणि अमरावती येथे 4 नवीन प्रयोगशाळा प्रस्तावित.
- प्रयोगशाळांमध्ये हवा, पाणी आणि घातक कचऱ्याचे नमुने विश्लेषण करण्यासाठी BIS मानकांनुसार अत्याधुनिक उपकरणे.
- प्रयोगशाळा सक्षम / अद्यावत करण्याच्या केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार विश्लेषणात्मक आणि संशोधनात्मक प्रकल्पाच्या अनुषंगाने, आवश्यक असलेल्या 38 अत्याधुनिक उपकरणांच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर.

# इतर उपक्रम -

- पर्यावरणातील अर्थशास्त्र व संधी परिषदेचे, डी वाय पाटील विद्यापीठ, नवी मुंबई येथे दि. ११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी आयोजन. या परिषदेला मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रातील उद्योग आस्थापनांचे प्रतिनिधी, विविध महाविद्यालयातील तरुण आणि त्याचबरोबर पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर संस्थांचे ९०० प्रतिनिधी उपस्थित.
- महाराष्ट्रातील साखर कारखाने व आसवणी प्रकल्पामधील पर्यावरण अधिकारी/आसवणी व्यवस्थापकांसाठी मे. वसंतदादा शुगर इंन्स्टिटयुट, पुणे यांच्या सहकार्याने परिषद प्रस्तावित आहे.
- महाराष्ट्रातील निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्याच्या प्रक्रियेसाठी STP ची कार्यक्षमता वाढविणे व आधुनिक तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीवर घरगुती सांडपाण्याच्या आधुनिक प्रक्रिया यंत्रणांची माहिती बाबत राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका यांची दि. 10.02.2025 रोजी आय.आय.टी मुंबई येथे परिषद घेण्यात आली.
- सर्क्युलर इकॉनॉमी विषयी जिल्हानिहाय अहवाल (निर्देशिका) तयार करण्यात आला आहे.

# धन्यवाद